ई-गव्हर्नन्ससाठी राज्याच्या कृषी विभागास केंद्राकडून सुवर्ण पदक

राज्यातील पिकांवर पडलेल्या कीड आणि रोगांचे योग्य पध्दतीने सर्व्हे करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाला केंद्र सरकारचे २०११-१२ सालचे ई- गव्हर्नन्ससाठीचे सुवर्ण पदक घोषित झाले असून भुवनेश्वर येथे पंधराव्या ई-गव्हर्नन्स परिषदेमध्ये या पारितोषिकाचे वितरण होणार असल्याची माहिती तत्कालीन कृषी आयुक्त आणि सध्याचे पुणे विभागीय आयुक्त प्रभाकर देशमुख यांनी पुणे येथे पत्रकार परिषदेत दिली. यावेळी कृषी आयुक्त उमाकांत दांगट उपस्थित होते. पहिल्यांदाच हा प्रकल्प राज्यात राबविण्यात आला होता.

सन २००८-०९ मध्ये सप्टेंबर-ऑक्टोबर २००८ या कालावधीत राज्यातील मराठवाडा व विदर्भ विभागात सोयाबीन पिकावर अचानक मोठ्या प्रमाणात स्पोडोप्टेरा व इतर पाने खाणाऱ्या अळ्या या कीडींचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला. अल्प कालावधीतच कीडीने एवढे रौद्र व्यापक रुप धारण केले की राज्यातील ३०.६३ लाख हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन पिकाखालील क्षेत्रापैकी १४.६४ लाख हेक्टर क्षेत्र (४८ टक्के) बाधित झाले. मराठवाडा व विदर्भात कृषी अर्थशास्त्र मुख्यत: कापूस व सोयाबीन पिकाशी निगडीत असल्याने शेतकऱ्यांचा आर्थिकदृष्टया कणाच मोडल्यासारखी स्थिती होती. शासनास नुकसान भरपाईपोटी रु.४५०.०० कोटी सानुग्रह अनुदान वाटप करावे लागले. या गंभीर समस्येची दखल घेत केंद्र शासनाने तज्ञांचा चमू राज्यात अभ्यासासाठी पाठविला.

केंद्र शासनाच्या तज्ज्ञांनी या परिस्थितीवर नोंदविलेल्या निरीक्षणात तत्कालीन कीड/रोग सर्वेक्षण पध्दतीतील प्रमुख उणीवा प्रकर्षाने निदर्शनास आल्या. नवी दिल्लीच्या राष्ट्रीय एकात्मिक कीड रोग व्यवस्थापन केंद्राच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर, केंद्रीय कडधान्य संस्था, कानपूर, सोयाबीन संशोधन संचालनालय, इंदौर व केंद्रीय कारेडवाहू संशोधन संस्था (क्रिडा) हैद्राबाद या केंद्रीय संस्थाव्यतिरिक्त राज्यातील चारही कृषी विद्यापीठातील

तज्ज्ञांसमवेत एक समग्र कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) तयार करुन राष्ट्रीय कृषी विकास आराखड्यांतर्गत त्यास मान्यता घेवून निधी उपलब्ध करुन देण्यात आला. या प्रकल्पाद्वारे देशात प्रथमच पिकांवरील कीड/रोगांचे शास्त्रोक्त पध्दतीने नियमीतपणे सर्वेक्षण करुन निरीक्षणे संगणकाद्वारे संकलित करणे , त्यांचे शास्त्रीयदृष्ट्या विश्लेषण करुन त्याचा तपशील तज्ज्ञांना तत्काळ उपलब्ध होणे, तज्ज्ञांनी स्थानिक परिस्थितीनुरुप कीड/रोग व्यवस्थापनाचे सल्ले संगणकाद्वारे देणे, सदर सल्ले तालुका स्तरावरुन नोंदणीकृत शेतकऱ्यांना एसएमएस सेवेद्वारे पोहचविणे आणि ते विस्तृत स्वरुपात ग्रामपंचायतीत व वृत्तपत्रे व संपर्क माध्यमांद्वारे प्रसिद्ध करणे, जेथे कीड/रोगाचे प्रमाण नुकसान संकेत पातळीपेक्षा अधिक आढळले तेथे शासकीय योजनांद्वारे अनुदानावर किटकनाशके पुरविणे अशी अत्यंत व्यापक स्वरुपात राज्यात मोहिम सन २०९-१० पासून घेण्यात आली. यासाठी पहिल्यांदाच ई गव्हर्नन्सचा वापर करण्यात आला.

सर्वेक्षणाच्या कामासाठी ७८० कीड सर्वेक्षकांना ८२ कीड नियंत्रकांना व ८२ संगणक प्रचालकांना (डाटा एन्ट्री ऑपरेटर्सना) हंगामी स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्त केले. त्यांना व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना कृषी विद्यापीठात प्रशिक्षित करण्यात आले. राज्यातील खरीप हंगामातील प्रमुख पिके कापूस, सोयाबीन, तूर व रब्बी हंगामातील हरभरा या पिकांच्या सर्वेक्षणासाठी प्रकल्प राबविण्यात आला. हा प्रकल्प राज्यात यशस्वी ठरला. त्याची दखल केंद्र शासनाने घेतली व या प्रकल्पासाठी सुवर्ण पदक जाहीर केले. राज्याचा गौरव वाढविणारे हे सुवर्ण पदक घोषित झाल्याबद्दल विभागीय आयुक्त प्रभाकर देशमुख यांनी यावेळी आनंद व्यक्त केला आणि या प्रकल्पासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे त्यांनी विशेष आभार मानले आहेत.

साभार :- http://mahanews.gov.in